ISBN : 978-93-92310-15-7

❖ शिर्षक ❖

# ''भारतीय स्त्रीयांचे सक्षमीकरण''

● संपादक ●

डॉ.वासुदेव डोंगरदिवे

एम.ए. इतिहास, समाजशास्त्र, बि.पी.एड., नेट., जे.आर.एफ., पीएच.डी.

❖ PUBLISHED BY ❖

RAMANSHIL PUBLICATION

AURANGABAD (M.S.)

# अनुक्रमणिका/Contents


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृ |
|---|---|---|
| २८ | आधुनिक स्त्री : नवी आव्हाने, नवी दिशा<br>प्रा. संदीप चपटे | |
| २९ | प्राचीन भारतीय स्त्री कर्तृत्व व योगदान<br>प्रा. जगताप शुभांगी जगदीश | |
| ३० | कॉम्रेड के. के. शैलजा : राजकीय क्षेत्रातील एक सक्षम महिला नेतृत्व<br>डॉ. जमीर तांबोळी | |
| ३१ | पालघर जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या परिवर्तनात गोदावरी परुळेकरांचे योगदान<br>भास्कर गोतीस | |
| ३२ | आधुनिक भारतीय स्त्री कर्तृत्व : पंडिता रमाबाई व सावित्रीबाई फुले<br>डॉ. दयानंद प्रभू गायकवाड | |
| ३३ | महिला मुक्तीच्या क्रांतीकारी महानायिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले<br>प्रा. डॉ. निशांत भिमरावजी शेंडे | |
| ३४ | आधुनिक भारतीय स्त्री कर्तुत्व व योगदान<br>सौ. चंचल सागर जाधव | |
| ३५ | महिला सक्षमीकरण<br>प्रा.डॉ.आर.डी.खताळ | |
| ३६ | स्त्री स्वलीकरणातील महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे योगदान<br>प्रा. सुमन लक्ष्मणराव केंद्रे | |
| ३७ | कृषी क्षेत्रात महिलांची भूमिका<br>डॉ.उल्हास रामजी राठोड | |
| ३८ | आधुनिक काळातील भारतीय स्त्रियांची सामाजिक स्थिती, कर्तुत्व व योगदान<br>दिपाली एच. पंधरे | |
| ३९ | आत्महत्याग्रस्त किसान विधवाओं की पीड़ा : एक अध्ययन<br>भाग्यश्री श्रीकृष्णराव गाडगे | |
| ४० | दलित महिलाओं की सामाजिक स्थिती का विश्लेषणात्मक अध्ययन<br>Kalpana Devidasji Burhan | |

# ३५. महिला सक्षमीकरण

प्रा. डी. आर. डी. [illegible]

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजी नगर गढी, ता. गेवराई, जि. बीड.

**प्रास्ताविक**

पारंपारिक काळापासून भारतीय समाजात महिलांना समाजात विशेष स्थान दिले आहे पण पुरुषप्रधान संस्कृतीत त्यांना विविध अधिकारांपासून वंचीतही ठेवलेले दिसून येते म्हणून महिलांना समाजात मान सन्मान प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी महिला सक्षमीकरणावर भर देण्यास प्रारंभ झालेला दिसून येतो विविध कायदे आणि कल्याण कार्यक्रमांच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्राबरोबरच इतर क्षेत्रातही महिलांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करणे आणि निर्णयाच्या संधी उपलब्ध करून देणे व स्त्री-पुरुष असताना न्याय करणे या प्रक्रियेला महिला सक्षमीकरण असे म्हणतात. दुसऱ्या शब्दात महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना सामाजिक आणि आर्थिक स्थिती सुधारणे जेणेकरून त्यांना रोजगार, शिक्षण, आर्थिक प्रगतीसाठी समान संधी मिळतील, त्यांना सामाजिक स्वातंत्र्य आणि प्रगती करता येईल.

स्त्री सृष्टीची निर्मिती मानली जाते म्हणजेच मानवाचे अस्तित्व स्त्रीपासून मानने क्रमप्राप्त ठरते. महिला सक्षमीकरणाचा अर्थ या स्त्रीशक्तीची शक्ती विकसीत करणे आणि त्याला सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय विचार स्वातंत्र्य, विश्वास, धर्म आणि उपासना, इत्यादींची समानता प्रदान करणे आहे.

महिला सक्षमीकरण या आधुनिक काळातील महत्त्वाचा विषय आहे. आपल्या प्राचीन ग्रंथात स्त्रियांना विशेष महत्त्व दिलेले दिसून येते. पण स्त्रीमध्ये शक्ती असूनही तिच्या सक्षमीकरणाची गरज आहे. स्त्रियांचे आर्थिक सक्षमीकरण म्हणजे त्यांचे आर्थिक निर्णय, उत्पन्न, मालमत्ता आणि इतर गोष्टींची उपलब्धता फक्त सुविधा मिळवून त्यांचा सामाजिक दर्जा उंचावू शकतात राष्ट्र त्या विकासात महिलांचे महत्त्व आणि हक्काविषयी समाजात जागरूकता आणण्यासाठी आंतरराष्ट्रीय महिला दिनासारखे कार्यक्रम शासनाकडून राबविले जातात. भारतात महिलांना सशक्त करण्यासाठी सर्वप्रथम समाजातील त्यांचे अधिकार आणि मूल्ये नष्ट करणाऱ्या सर्व राक्षसी विचारांना नाहीसे करणे क्रमप्राप्त होते.

**शोध निबंधाची उद्दिष्टे :-**

महिला सक्षमीकरण या शोध निबंधाबाबतची उद्दिष्टे खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले.

१. महिला सक्षमीकरण ही संकल्पना अभ्यासणे.

२. महिला सक्षमीकरणाबाबतच्या विविध योजनांचा अभ्यास करणे.

**शोध निबंधाची गृहितके :-**

महिला सक्षमीकरण या शोध निबंधाची गृहितके खालीलप्रमाणे -

१. महिला सक्षमीकरण ही व्यापक आणि विस्तृत संकल्पना आहे.

२. महिला सक्षमीकरणासाठी विविध योजना राबविल्या जातात.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोध निबंधासाठी संशोधनातील दुय्यम तथ्य संकलन तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब केलेला असून त्यासाठी संदर्भग्रंथ संदर्भीय पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे आणि इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या माहितीचा आधार घेण्यात आलेला आहे. यावरून प्रस्तुत शोध निबंधाचे लेखन करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

महिला सक्षमीकरण ही संकल्पना शिक्षण आणि ज्ञानाने आधुनिक महिलांनी आणि महिलांच्या अधिकारांशी संबंधित संकल्पना आहे. पारंपारिक दृष्टीकोनातुन भारतीय समाजाचा एक अविभाज्य भाग असुनही मानसन्मान, प्रतिष्ठा मिळविणे नाही. केवळ एक भोग वस्तु म्हणुन स्त्रियांकडे पाहण्याची समाजाची प्रवृत्ती असलेली दिसुन येते. म्हणुन महिलांना समाजात मानसन्मान, प्रतिष्ठा मिळवुन देवुन त्यांचे अस्तित्व मान्य करुन देण्यासाठी महिला सक्षमीकरण ही संकल्पना समाजात अधिक व्यापक प्रतिष्ठा मिळवुन देवुन त्यांचे अस्तित्व मान्य करुन देण्यासाठी महिला सक्षमीकरणाबाबत जागृती होताना दिसते. अस्तित्वात येताना दिसुन येते ही एक काळाची गरज असल्याने समाजात ही महिला सक्षमीकरणाबाबत जागृती होताना दिसते.

**भारतातील महिला सक्षमीकरणासाठीच्या विविध योजना :-** यातील अनेक योजना रोजगार, शेती आणि आरोग्य

भारतात महिला सक्षमीकरणासाठी विविध योजना राबविल्या जातात. यातील अनेक योजना रोजगार, शेती आणि आरोग्य यासारख्या बाबींशी संबंधीत आहेत. या योजना भारतीय महिलांची परिस्थिती लक्षात घेवुन तयार करण्यात आल्या आहेत जेणेकरुन समाजातील त्यांचा सहभाग वाढवला जाईल. यातील मुख्य योजना म्हणजे मनरेगा, सर्व शिक्षा अभियान, जननी सुरक्षा योजना याशिवाय काही प्रमुख योजना खालीलप्रमाणे -

**1) बेटी बचाओ बेटी पढाओ योजना :-** स्त्रीभ्रुण हत्या आणि मुलींचे शिक्षण डोळ्यासमोर ठेवुन ही योजना तयार करण्यात आली. या अंतर्गत मुलींच्या शिक्षणासाठी नियोजीत करुन त्यांना आर्थिक मदत देवुन मुलीचे एक ओझे म्हणुन असलेले विचार बदलण्यास मदत होते.

**2) महिला हेल्पलाईन योजना :-** या योजने अंतर्गत महिलांना 24 तास आपत्कालीन सहाय्य सेवा पुरवली जाते. महिला या योजने अंतर्गत दिलेल्या क्रमांकावर कोणत्याही प्रकारची हिंसा किंवा त्यांच्या विरोधातील गुन्ह्याची तक्रार करु शकतात. या योजने अंतर्गत महिलांना देशभरात 181 नंबर डायल करुन त्यांच्या तक्रारीची नोंद घेतली जाते.

**3) उज्वला योजना :-** महिलांची तस्करी आणि लैंगीक शोषणापासुन संरक्षण करण्यासाठी ही योजना सुरु करण्यात आली आहे. याशिवाय त्यांचे पुर्नवसन आणि कल्याणासाठी काम केले जाते.

**4) महिलांसाठी प्रशिक्षण आणि रोजगार कार्यक्रमला समर्थन (STEP) :-** या योजने अंतर्गत महिलांतील कौशल्य सुधारण्याचे काम केले जाते जेणेकरुन त्यांनाही रोजगार मिळु शकेल किंवा त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील तसेच स्वतःचा व्यवसाय सुरु करता येईल. या योजने अंतर्गत स्त्रियांना शेती, फलोत्पादन, हातमाग, शिवणकाम आणि मत्स्य पालन इत्यादी विविध क्षेत्रात शिक्षीत केले जाते.

**5) महिला शक्ती केंद्र :-** या योजने अंतर्गत ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणावर लक्ष केंद्रित केले जाते. या अंतर्गत विद्यार्थी आणि व्यावसायिकांमध्ये समुदाय, स्वयंसेवक ग्रामीण महिलांना त्यांचे हक्क आणि कल्याणकारी योजनांची माहिती देतात.

**6) पंचायत राज योजनांमध्ये महिलांसाठी आरक्षण:-** 2009 मध्ये केंद्रीय मंत्रीमंडळाने पंचायत राज संस्थामध्ये 50% महिलासाठी आरक्षणाची घोषणा केली. ग्रामीण भागातील महिलांची सामाजिक स्थिती सुधारण्याचा सरकारचा प्रयत्न ज्याद्वारे बिहार, झारखंड आणि ओरिसा आणि आंध्रप्रदेश आणि इतर राज्यात मोठया संख्येने महिला ग्रामपंचायत अध्यक्ष म्हणुन निवडुन आल्या.

कायदेविषयक अधिकार असलेल्या स्त्रियांना सक्षम करण्यासाठी संसदेने काही अधिनियम मंजुर केले आहेत ते खालीलप्रमाणे -

१. अनैतिक वाहतुक (प्रतिबंध) कायदा - 1956

२. हुंडा प्रतिबंध कायदा - 1961

३. समान मोबदला कायदा - 1976

४. वैद्यकीय समाप्ती गर्भधारणा कायदा - 1987

५. लिंग चाचणी तंत्र कायदा - 1994

ISBN : 978-93-91310-15-7


६. बालविवाह प्रतिबंध कायदा - 2006

७. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ कायदा - 13

समारोप :-

आधुनिक काळातही भारतात महिला सक्षमीकरणाची नितांत आवश्यकता आहे. प्राचीन काळाच्या तुलनेत मध्ययुगीन काळात भारतीय महिलांच्या मान सन्मानाची पातळी खालावलेली दिसून येते प्राचीन काळापासून हिंसा, निरक्षरता, लैंगिक शोषण, असमानता, भ्रूणहत्या, महिलांवरील घरगुती हिंसा, वेश्या व्यवसाय, मानवी तस्करी, भारतात स्त्री पुरुष असमानतेचे प्रमाण सर्वाधिक दिसून येते महिलांना त्यांच्या कुटूंबाबरोबरच बाहेरही समाजात वाईट वागणुक मिळते अशा वागणुकीतुन महिलांची सुटका होण्यासाठी महिलांचे सक्षमीकरण होणे काळाची गरज आहे.

स्त्रीशिवाय पुरुषाचे आणि पुरुषाशिवाय स्त्रीयांच्या जीवनाला पुर्णत्व नाही 1882 साली ताराबाई शिंदे यांनी स्त्रीपुरुष तुलना या ग्रंथात ईश्वराने हा जोडा स्वच्छेने नेमीला आहे पशु पक्षापासून ते निर्जिव झाडाझुडूपात देखील त्याने स्त्री जाती निर्माण केलेली आहेच. प्रत्येक गोष्टीला, जिनसेला, दुसरा त्याच जोडीचा मुकाबला असतो. त्याबाचुन शोभा येत नाही. स्वामी विवेकानंदांनी म्हटल्याप्रमाणे, जगाचा विकास स्त्री सहकार्याशिवाय शक्य नाही. ज्याप्रमाणे पक्षाला एका पंखाने उडता येत नाही तसेच मानवाला स्त्रीशिवाय प्रगती करता येत नाही. देशाच्या विकासामध्ये महिलांचा सहभाग वाढवुन त्यांना सबला करुन सक्षम करणे आवश्यक आहे त्या परिस्थितीमध्ये बदल घडवुन आणण्यासाठीचे प्रयत्न हे केवळ शासकीय पातळीवरच होणे पुरेसे नसुन त्याची सुरुवात व्यक्ती व कुटूंबापासुन होणे गरजेचे आहे यासाठी महिलांमध्ये स्वयं जागृतीची आवश्यकता असुन यामुळेच महिलांचे सक्षमीकरण शक्य होणार आहे.

संदर्भसूची:-

१. सुचना का अधिकार और महिला सक्षमीकरण - जया पाण्डेय : रोशनी पब्लिकेशन्स, कानपुर, प्रथम आवृत्ती 2012.

२. स्त्री-सशक्तीकरण के आयाम : कविता शर्मा रजत प्रकाशन नई दिल्ली 2011 (प्रथम आवृत्ती)

३. महिला सबलीकरण समस्या आणि उपाय - प्रा. डॉ. रेखा हिंगोले, इशा प्रकाशन , लातुर प्रथम आवृत्ती 2006

४. भारतीय स्त्री आणि प्रतिमा - मीना केळकर, नितीन प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती 1990

५. समकालीन जागतिक राज्यकारणातील प्रमुख समस्या - डॉ. ज.रा.शिंदे, डॉ. प्रशात अमृतकर, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.